**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : 0231-2609000 Special Cell -0231-260 9148
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन ०२३१– २६०९००० विशेष कक्ष ०२३१–२६०९१४८
Estd : 1962
A++ Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

जा.क्र.विशेष कक्ष / 2021-22/355-A      दिनांक 3 AUG 2021

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. सचिव,
सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : १. सन २०२१ – २०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये संलग्नित महाविद्यालये / शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षण
२. सन २०२१ – २०२२ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी वसतिगृह (हॉस्टेल) प्रवेशाबाबत..

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये / संस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी ,खालीलप्रमाणे आपणास योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJ-A | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NT-B | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NT-C | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NT-D | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | EWS | १० % |
| ९. | खुला | Open | ४० % |
| | | एकूण | १०० % |

( टीप : १. संस्था / महाविद्यालयातील प्रवेशासाठीच्या जबाबदार अधिका–यांनी शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही शेवटच्या प्रवेश दिनांकापर्यंत करावयाची आहे.

२. दि. ०५ मे, २०२१ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार एसईबीसी संवर्ग रद्द करणेत आलेला आहे. तथापि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जर बदल झाल्यास उपरोक्त आरक्षण टक्केवारीतही बदल होऊ शकतो.

**विद्यार्थी प्रवेशातील समांतर आरक्षणाबाबत :**

सामाजिक आरक्षणाबरोबरच खालीलप्रमाणे समांतर आरक्षण विद्यार्थी प्रवेशासाठी शासनाने निर्धारित केले आहे –

१. विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये महिलांसाठी पदवीस्तरावर शासन निर्णय क्र. जीईसी –२००० (१२३/२००७)/टी ई.१ दि. १७.०४.२००० नुसार ३० टक्के आरक्षण देय आहे.

(सोबत पृष्ठ क्र. २ पहा)

Inward No 467

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१८/प्र.क्र.२३१/मांशि—४ दि.२५.६.२०१८ नुसार अकृषी विद्यापीठे संलग्नित महाविद्यालयातील सर्वस्तरीय प्रवेशामध्ये दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी ५ टक्के आरक्षण देय आहे. (सोबत पृष्ठ क्र. ८ ते ९)

३. शासन निर्णय क्र. २०११/प्र. क्र. २०१२/क्र. ३ दि. ०२.०४.२०१८ नुसार अनाथ विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १ टक्का आरक्षण देय आहे. (सोबत पृष्ठ क्र. १० ते १२)

४. माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १० टक्के आरक्षण देय आहे. यासंदर्भातील कार्यवाहीसाठी कृपया खालील शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, अवलोकनी घेण्यात यावीत : (सोबत पृष्ठ क्र. १३ ते १८)

अ) महाराष्ट्र शासनाचे क्र. औचिमु २०१२/प्र. क्र. १८७/विशि— ३ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. १६.०८.२०१२ रोजीचे शासन पत्र.

ब) महाराष्ट्र शासन, मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे क्र. युएनआय/२०१२/मा. सैनिक/अवि/विशि — ८/१८७११ दि. ०६.१२.२०१२ रोजीचे शासनपत्र.

क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. माजीसै—२००६/(२४१/०६)/मशि—६ दि. १०.०९.२००७ रोजीचे शासन पत्र.

ड) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम.१२०४/१६७/८५/मा.शि. दि. १३.०६.१९८५ रोजीचे शासनपत्र.

इ) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम. १९८४/१८५/८४३/ मा. शि—४ दि. २८.०६.१९८४ रोजीचे पत्र.

फ) महाराष्ट्र राज्य, सैनिक कल्याण विभागाचे क्र. १८१६४/शै.स/सैकवि—१७ दि.२८.०२.२०१७ रोजीचे पत्र.

वरील सर्व शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, इत्यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) उपलब्ध आहेत.

**प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील इतर सर्वसाधारण सूचना :**

१ संलग्नित महाविद्यालये/संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांनी गुणवत्ता यादी (Merit list) तयार करून खुल्या किंवा अराखीव संवर्गातील पर्याप्त जागांवर प्रथमतः विद्यार्थी/विद्यार्थीनींना त्यांच्या मागास प्रवर्गाचा विचार न करता गुणानुक्रमे खुल्या प्रवर्गातून प्रवेश द्यावा. (सोबत पृष्ठ क्र. १९)

२ वरीलबाबत मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना खुल्या प्रवर्गातील जागांवर त्यांच्या गुणानुक्रमे प्रवेश दिला जात असल्याने आरक्षणाची विहित मर्यादा अथवा टक्केवारी त्यामुळे ओलांडली असे होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

३ सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी (अनु. जाती/अनु.जमाती व्यतिरिक्त) विहित मुदतीतील शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नॉन—क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या १० टक्के आरक्षणांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनीही त्याबाबतचे शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. (सोबत पृष्ठ क्र.२० ते २२)

४ विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची पदे ज्या मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत त्याच मागास प्रवर्गातून सर्व नियमांचे काटेकोर पालन करुन भरणे आवश्यक आहे. संबंधित मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या उपलब्धते अभावी प्रवेश रिक्त रहात असतील तर अन्य मागास प्रवर्गातून रिक्त प्रवेश पूर्ण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

(सोबत पृष्ठ क्र.२३ ते २४)

५ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयात विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्याबाबत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी (एम. फिल व पीएच. डी वगळून) करावयाची कार्यवाही, शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ व क्र. ४ येथे नमूद केली आहे. ती खालीलप्रमाणे :

मुद्दा क्र.(३): गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

मुद्दा क्र. (४): रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी संबंधितांनी दि.११.७.१९९७ रोजीचा मूळ शासन निर्णयही कृपया सविस्तर अवलोकनी घ्यावा. सदर शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

६ विद्यापीठातील पीजीबीयुटीआर विभागाद्वारे नियंत्रित होणाऱ्या एम.फिल/पी.एचडी प्रवेशासंदर्भात युजीसी वा अन्य शिखर संस्थानी विद्यार्थी प्रवेशाबाबत सूचना जारी केल्या असतील तर सदर प्रवेशासाठी त्या विचारात घेणेत याव्यात. संबंधितांनी यासंदर्भात पीजीबीयुटीआर विभागाच्या प्रवेश माहितीपुस्तिकेचे (Prospects) सुक्ष्म अवलोकन करावे. सदर एम.फिल/पी.एचडी अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या जागा विद्यार्थ्यांच्या उपलब्धतेऐवजी रिक्त राहिल्या तर त्या त्याच मागास प्रवर्गांतर्गत भरण्यासाठी पुन:श्च विशेष प्रवेश मोहिमेचे (Special drive) आयोजन संबंधित विभागाद्वारे करण्यात येईल. तसेच विशेष मोहिमेचे आयोजन करुनही मागास प्रवर्गातील प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्या वर क्र. ५ येथे नमूद केलेल्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तदतूदीनुसार भरण्यात याव्यात.

एम.फिल/पी.एचडी विद्यार्थी प्रवेशातील रिक्त राहिलेल्या मागासवर्गीय जागांबाबत विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने केलेल्या शिफारसी, त्यांस मा. कुलगुरु व स्थायी समितीने दिलेली मान्यता यांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णयातील तरतूदीच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदीसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

७ दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी सदर आरक्षणाबाबत शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८ विद्यापीठातील विविध अधिविभागांनी विद्यार्थी प्रवेशातील दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेश देत असताना, विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीतील मुद्दा क्र.२ बाबत नमूद केलेल्या अ,ब आणि क या टप्प्यानुसार कार्यवाही करावी. दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत देण्यात येत आहे.

(सोबत पृष्ठ क्र.२५ ते २६)

९ मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल नं.३१२३/२०२० या प्रकरणी दि.०५ मे २०२१ रोजी दिलेल्या "सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या" (एसईबीसी) आरक्षण संदर्भातील निर्णयास अनुसरुन, "आर्थिकदृष्टया दुर्बल घटक" (ईडब्लूएस) आरक्षण संदर्भात निर्गमित केलेल्या महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.३१/०५/२०२१ रोजीच्या शासननिर्णयातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

(सोबत पृष्ठ क्र.२७ ते ३४)

१० महाविद्यालय/संस्था यांच्या स्तरावर विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या संबंधाने काही विशेष बाब निर्माण झाल्यास अथवा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचे निराकरण संबंधित महाविद्यालयातील/संस्थेतील प्रवेश समितीने, टंडक १५८ नुसार संबंधित महाविद्यालयात/संस्थेत गठित केलेल्या स्थायी समितीच्या माध्यमातून करावयाचे आहे. विद्यापीठ स्तरावरील यासंदर्भातील कार्यवाही संबंधित अधिविभागातील प्रवेश समिती आणि विशेष कक्ष स्थायी समिती (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) अथवा स्थायी समिती गठित उपसमिती यांचेद्वारे करण्यात येईल.

११ स्कॉलरशीप अथवा फ्रिशीपसाठी अर्ज करणाऱ्या पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून, शासनाच्या सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य, क्रीडा व विशेष सहाय विभागाच्या क्र. इबीसी.२००३/प्र.क्र./३०१/मावक--२ दि. १.११.२००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणतेही शैक्षणिक शुल्क घेता येणार नाही.

१२ शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या सामाजिक आरक्षणापैकी ज्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणासंदर्भातील बाबी न्यायप्रविष्ठ आहेत त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, व सदरबाबत शासनाकडून ज्या त्या वेळी प्राप्त होणारे शासन निर्णय/परिपत्रके इ. नुसार करणे बंधनकारक आहे.

१३ विद्यार्थी प्रवेशामध्ये सामाजिक अथवा समांतर आरक्षण लागू करण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय/परिपत्रके/शासन पत्रे इ. द्वारे विहित केलेल्या सर्व शर्ती आणि अटी या आरक्षणांतर्गत प्रवेश घेण्यासाठी लागू आहेत.

१४ महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाबाबत उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण सूचना करण्यात येत आहेत. तथापि, त्यामध्ये मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणारे नियम, अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके, विद्यापीठ

सन २०२१–२२ मधील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया विहित पध्दतीचा अवलंब करुन नियमानुसार करण्यात यावी.

महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागामध्ये सन २०२१–२२ करिता देण्यात येणाऱ्या विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची माहिती विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागाद्वारे स्वतंत्र परिपत्रकान्वये मागविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विभागाकडे विहित प्रपत्रातील माहिती महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागानी तात्काळ देणे अत्यावश्यक आहे याची नोंद घेण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत : माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१. पदव्युत्तर प्रवेश विभाग
२. पीजी बीयुटीआर विभाग
३. सांख्यिकी विभाग

महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. पीईसी-१०००/(१२१/२०००)/मशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १७ एप्रिल, २०००

**प्रस्तावना:-**

भारताच्या संविधानात, स्त्री-पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरीकांचा मुलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमांकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने खास प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करून सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे अग्रक्रमाने लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दि.२२.६.१९९४ अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३० टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमांकरिता ३० टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

**शासन निर्णय:-**

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गांसाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा १०० असतील तर त्यापैकी ३० जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गांकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) राहील. उदाहरणार्थ असे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता १३ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३० टक्के आरक्षण हे अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष संवर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी १०० जागा असतील तर त्यापैकी १३ जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेऊन त्यापैकी ३० टक्के म्हणजेच ४ जागा ह्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.



(पु.पा.प.

वर उल्लेखिलेल्या पदवीनंतर प्रवेश सर्व प्रवर्गांकरिताही सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत ३० टक्के समांतरपणे आरक्षण ठेवण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता गुणवत्तेवर प्रवेश जागांवर देण्यात येतात त्या प्रवेशा अंतर्गत देखील ३० टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

तसेच सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र. टीईएम-१०९५/(२७१९)/तांशि-५, दि.१७.१.१९९६ अन्वये ठेवलेल्या २० टक्के आरक्षणात वाढ करून आता ते ३० टक्के इतके करण्यात येत आहे.

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरुष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरण्यात येणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पशु विभागांतर्गत येणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागांकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

वरील आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन २०००-२००१ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, [illegible], महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व कुलसचिव
सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने व संस्था (तंत्र शिक्षण संचालकांमार्फत)
प्राचार्य, सर्व वरिष्ठ महाविद्यालये (उच्च शिक्षण संचालकांमार्फत)
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
मा. सचिव, कृषि यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,
मा. प्रधान सचिव, वित्त यांचे स्वीय सहाय्यक,
मा. सचिव (सर्वसाधारण प्रशासन उपविभाग), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखाली येणारी सर्व विभागीय कार्यालये (संबंधित विभागामार्फत)
सर्व कार्यासने, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, तांशि-१.